महाराष्ट्र शासन MSBSVET, MSSDS, YCMOU, ITS, Skill India मान्यता प्राप्त
PEI पाटील इलेक्ट्रॉनिक्स इन्स्टिट्यूट
Email : patilinstitutesatara@gmail.com
महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ, मुंबई बोर्डाच्या कोर्सेसना प्रवेश
सर्टीफिकेट कोर्सेसना प्रवेश : पात्रता - १० वी, १२ वी पास/नापास व कॉलेजचे विद्यार्थी
■ इलेक्ट्रिकल सुपरवायझर ■ इलेक्ट्रिकल वायरमन ■ टू-व्हीलर मेकॅनिक ■ A.C. मेकॅनिक ■ कॉम्प्युटर ऑपरेटर
■ ॲटोमोबाईल टेक्निशियन ■ मोटार वायंडिंग ■ फोर व्हीलर मेकॅनिक ■ वेल्डर / फ्लंबर ■ कॉम्प्युटर हार्डवेअर
एस. टी. पास, लायसेन्स व प्लेसमेंटची सोय
प्लॉट नं. ११, राधिका रोड, एस.टी. स्टॅण्डजवळ, सातारा.
प्रवेशासाठी संपर्क : ९८२२०९७०७१

दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक
# कटूसत्य
किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com

नका कॅन्सरला आमंत्रण देऊ...
दारू... अंमली पदार्थ...
गॅरंटेड सुटण्यासाठी...
व्यसन + टेन्शन + भिती + चिंता + नैराश्य + हस्तकंप + निद्रानाश..
(महाराष्ट्राचे पसंतदिदा नशामुक्ती सेंटर)
डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र
फोन: 9552619752
कॉल/व्हॉटस्ॲप करा... दारू... अंमली पदार्थ... राम राम करा...
501% रिझल्ट

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक ३६ वा | सोमवार, दि. २५ ऑगस्ट २०२५ | पाने ४ | पोष्ट परवानाः - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

विकणे /भाड्याने देणे आहे
वासूद रोड वरील पाण्याच्या टाकीच्या उत्तरील बाजुस असणाऱ्या शिनगारे प्लॉट मधील क्लिअर टायटल प्रॉपर्टी (ट्वीन बंगलो) विकणे आहे.
संपर्क : डी. बी. शिंदे
मो.: ९५७९४२१४६५ ८२७५२७४२५३
पत्ताः अल्टिमेट जिमच्या समोर, सांगोला

# चलो मुंबई ! शेवटची लढाई, गुलाल उधळूनच परतायचं; जरांगेंचा सरकारला इशारा

## प्रत्येकाने मुंबईला या, राजकीय नेत्याचे ऐकून गावात थांबू नका

**बीड (कटूसत्य वृत्त):-** मराठा समाजाला आरक्षण मिळावं या मागणीसाठी मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी थेट मुंबईत मोर्चा नेण्याचा निर्धार केलाय. यासाठी बीडमध्ये बैठकीचं आयोजन करण्यात आलंय. या बैठकीच्या ठिकाणी बोलताना मनोज जरांगे पाटील यांनी २९ ऑगस्टला चलो मुंबईची घोषणा दिली.

यावेळी आरक्षण घेतल्याशिवाय परतायचंच नाही. आरक्षण डोक्यावर घेऊन गुलाल उधळूनच परत यायचं अशी भूमिका जरांगे पाटील यांनी मांडली. राजकीय नेत्यांच्या





दबावाला बळी पडून मुंबईला यायचं थांबू नका असं आवाहनही स्थानिक नेत्यांना जरांगेनी केला.

मंत्री फी भरणार नाही, लेकराबाळांचं शिक्षण होणार नाही. तुमची सत्ता आली म्हणून फुकट नोकऱ्या नाही लागणार. इथं जातीवर संकट आलंय तर तुम्हाला रक्षण करावं लागेल. सरकार मराठ्यांवर संकट आणतेय पण आता मराठा लढणार आहे असंही जरांगे पाटलांनी ठणकावून सांगितलं.

तुमच्या माझ्या भावनेचा राजकारण्यांनी वापर केला. माझ्या मराठा समाजाला प्रत्येक वेळी आवाहन असतं की आपली ताकद खूप मोठी आहे. फक्त विचारांनी चाललो नाही म्हणून लेकराबाळांचं नुकसान झालं. दुसऱ्याच्या डोक्यानं नाही तर स्वतःच्या डोक्याने चालायचं. बस जालं आथा. ज्यांनी यायचं त्यांनी नाटक शिकवायचं ज्ञान पाजळायचं. उभ्या पिढ्यांचं नुकसानं झालं अशी भावना जरांगे पाटील यांनी व्यक्त केली.

बीडमध्ये भरउन्हात बसलेल्या मराठा बांधवांना संबोधित करताना जरांगे पाटील म्हणाले की, उन्हातान्हात कुणी बसत नाही आजकाल. गर्व आहे तुमचा मला. तुम्ही उन्हात, पावसात बसता. तुमच्यासाठी मरायला सुद्धा तयार आहे. मला फोन आले लै ऊन पडलंय. मी (पान 2 वर..)

# मंगळवेढ्यात भिमेच्या पुराच्या पाण्याने पिकांचे नुकसान'

## हातातोंडाशी आलेली पिके पाण्यात, शेतकरी चिंतेत

**मंगळवेढा (कटूसत्य वृत्त):-** उजनी व वीर धरणातून अतिरिक्त पाणी भिमा नदीच्या पात्रात 1 लाख 87 हजार 850 क्युसेक सोडल्याने तालुक्यातील नदीकाठच्या गावाला पुराचा तडाका बसला. यामध्ये नदीकाठची हातातोंडाशी आलेली पिके सध्या पाण्यात गेल्याने शेतकऱ्याच्या चिंतेत आणखीनच भर पडली.

गेल्या दिवसापासून पुणे परिसर व नगर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात मुसळधार पाऊस पडल्याने या परिसरातील वीर व उजनी धरणातील पाणी नीरा व भिमा नदीत आल्याने भिमा नदीत 1 लाख 87 हजार 850



क्युसेक्सने गुरुवारी वाहत आहे. यंदा दोन वेळा भिमा नदी पुर सदृश्य परिस्थितीत वाहिली. मे च्या शेवटच्या आठवड्यात सर्वत्र मुसळधार पाऊस पडल्यामुळे भिमा नदी धोक्याच्या पातळीत वाहत होती. मध्यंतरी आलेल्या पाण्यामुळे वडापूर -सिध्दापूर को.प. बंधार्याचा भरावा वाहून गेला होता. नागरिकांच्या मागणीनंतर हा भरावा पुन्हा टाकण्यात आला.

मात्र सध्या आलेल्या पाण्यामुळे पुन्हा वाहून जाण्याची भीती व्यक्त केली जात आहे. तालुक्यातील भिमा नदी काठी उचेठाण,बठाण, माचणूर, अरळी, वडापूर, सिध्दापूर, आदी को.प. बंधारे पाण्याखाली गेले असून तिर्थक्षेत्र सिध्देश्वर मंदिरातील श्री जटाशंकर मंदिरही पाण्याखाली गेले. दरम्यान सध्या पुर सदृश्य परिस्थिती निर्माण झाल्याने नागरिकांनी पाण्याच्या प्रवाहात जावू नये असे आवाहन भिमा पाटबंधारे विभागाचे उपविभागीय अधिकारी श्रीशैल हालकुडे यांनी आवाहन केले. दरम्यान पुराने वेढा दिल्यामुळे तालुक्यातील ऊस, कांदा, केळी, डवळ, डाळिंब, द्राक्ष, मका,भाजीपाला या पिकाचे नुकसान मोठ्या प्रमाणात झाले.तर तहसीलदार मदन जाधव यांनी नदीकाठचे मंडल अधिकारी व तलाठी यांना पूरपरिस्थितीवर लक्ष ठेवण्याच्या सुचना दिल्या.

सतत पडणाऱ्या पावसामुळे आधीच फळबागाचे नुकसान झाले आहे, त्यात ऊजनी व विर धरणातुन सोडलेल्या पाण्यामुळे सिद्धापुर येथील ऊस, उडीद, केळी इत्यादी पिकासह मका, कडवळ सह जणावरांचे चारा पण पाण्याखाली गेल्यामुळे शेतीचे प्रचंड नुकसान झाले आहे, तरी शासनाने पंचनामे करून लवकरात लवकर नुकसान भरपाई द्यावे.

# सकल मराठा मोर्चाचा एल्गार; सोलापुरातून आतापर्यंत 25 हजार गाड्यांची नोंदणी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण मिळवण्यासाठी मनोज जरांगे यांच्या चलो मुंबई या आवाहनाला सोलापूर जिल्ह्यातून मोठा प्रतिसाद मिळत आहे. दरम्यान यावेळचा गणपती आम्ही अरबी समुद्रात विसर्जित करू, मुंबईकरांनी आम्हाला साथ द्यावी, असे आवाहन आता सकल मराठा मोचार्चे समन्वयक धनाजी साखळकर यांनी केले आहे.

राज्यातील लाखो मराठा बांधव मुंबईच्या दिशेने निघणार

मुंबईत दीड दिवसाचा गणपती असतो, मात्र महाराष्ट्रात दहा ते तेरा दिवसापर्यंत गणपती बसत असतो. यावर्षी मनोज जरांगे पाटलांच्या आंदोलनासाठी राज्यातील लाखो मराठा बांधव मुंबईच्या दिशेने निघणार असून




यंदाचा आमचा गणपती अरबी समुद्रात विसर्जित करण्याचा निर्णय आम्ही घेतला आहे. मुंबईकर आमच्या या निर्णयाच्या पाठीशी राहून आम्हालाही अरबी समुद्रात गणपती विसर्जन करू देतील, अशी अपेक्षा धनाजी साखळकर यांनी व्यक्त केली.

**25 हजार गाड्यांची नोंदणी, आकडा 50 हजारापर्यंत पोहोचेल असाविश्वास**

सोलापूर जिल्ह्यातून आतापर्यंत पंचवीस हजार गाड्यांची नोंदणी झाली असून पुढील तीन दिवसात हा आकडा 50 हजारापर्यंत पोहोचेल, असा विश्वास साखळकर यांनी व्यक्त केला आहे. यंदा घरी गौरी गणपती असूनही मोठ्या संख्येने मराठा महिला या आंदोलनात सहभागी होणार असल्याचा दावाही साखळकर यांनी केला आहे. आज सोलापूर जिल्ह्याच्या मराठा समाजाच्या वतीने पंढरपूर येथे पदाधिकाऱ्यांची बैठक झाली. यावेळी मोठ्या संख्येने महिला पदाधिकारी ही सामील झाल्या होत्या.

**मांजरसुंबा येथे मनोज जरांगे पाटलांचे होणार एक** क्विंटल फुलाच्या हाराने स्वागत

मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटील यांच्यासह मराठा समाज बांधव मुंबईकडे कूच करण्यापूर्वी आज (24 ऑगस्ट ) बीडमध्ये अंतिम निर्णायक सभेचं आयोजन करण्यात आले आहे. बीड जिल्ह्यातील मांजरसुंबा (Manjarsumbha) येथे ही सभा होणार आहे. आजच्या सभेतून मनोज जरांगे पाटील (Manoj Jarange Patil) सरकारला काय इशारा देणार? याकडे राज्याचे लक्ष लागून आहे. या दरम्यान मराठा आरक्षणाच्या पुढील दिशेबाबत महत्त्वाची घोषणा होण्याचीही शक्यता आहे.

अशातच, मराठाआंदोलक मनोज जरांगेंच्या स्वागतासाठी बीडच्या मांजरसुबा (पान 2 वर..)


# अतिवृष्टी व पुराच्या पाण्यामुळे झालेल्या शेती पिकाच्या नुकसानीचे पंचनामे त्वरित करावेत - जिल्हाधिकारी आशीर्वाद

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** जिल्ह्यात मागील काही दिवसापासून अतिवृष्टी, सततचा पाऊस तसेच उजनी धरण 100% भरल्याने तसेच वीर धरणातून भीमा व सीना नदीपात्रात मोठ्या प्रमाणावर पाणी सोडावे लागले



त्यामुळे दोन्हीही नदीकाठच्या गावांमध्ये तसेच शेती पिकामध्ये पुराचे पाणी जाऊन झालेल्या शेती पिकांच्या नुकसानीचे पंचनामे शनिवार दिनांक 23 ऑगस्ट 2025 पासून सुरू करावेत, असे आदेश कृषी, महसूल व ग्रामविकास यंत्रणांना जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिले.

तसेच जिल्ह्यात अतिवृष्टी व सततच्या पावसाने अनेक लघु व मध्यम प्रकल्प भरलेले असून या प्रकल्पातूनही पाणी ओव्हर फ्लो झाल्याने शेती पिकांचे नुकसान झालेले आहे, अशा ठिकाणचेही नुकसानीचे पंचनामे करण्याचे आदेश जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी दिले आहेत. पंचनाम्यापासून एक ही शेतकरी वंचित राहणार नाही याबाबत संबंधित यंत्रणांनी दक्षता घ्यावी, (पान 2 वर..)




निरामय पॅरालिसिस सेंटर
निरामय आयुर्वेद, पंचकर्म, योगा ॲण्ड फिजिओथेरपी सेंटर
ISO 9001:2015
खात्रीशीर उपचार 100% गॅरंटी आयुर्वेदिक व अलोपॅथी तज्ञांच्या निगराणीमध्ये
कितीही जुने पॅरालिसिस असो आयुर्वेदिक व अलोपॅथी उपचार पद्धतीने पंधरा ते वीस दिवसानंतर रिझल्ट येण्यास सुरुवात होते. हात काम करत नाही, चालता येत नाही, ब्रेनचा कंट्रोल जाणे बेडवर आहात काळजी करू नका खात्रीशीर उपचार



नांत आपुलकीचं, जिव्हाळ्याचं, माणुसकीचं आणि आधाराचं
समाजातील प्रत्येक घटकाशी ऋणानुबंध जपणारी संस्था
मोबाईल नं. 9503310568
पत्ताः गोळवलकर हॉस्पीटल च्या पाठीमागे, सुळे नगर, मोहोळ, जि. सोलापुर

# सुशीलकुमार शिंदेंनी काँग्रेस शहराध्यक्षांचे टोचले कान

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** काँग्रेस पक्षाचे नवे जिल्हाध्यक्ष सातलिंग शटगार आणि नव्या पदाधिकाऱ्यांचा ज्येष्ठ नेते सुशीलकुमार शिंदे यांच्या हस्ते सत्काराचा कार्यक्रम आज (ता. 24 आगस्ट) झाला.

त्या कार्यक्रमात काँग्रेस पदाधिकाऱ्यांना लढण्याचे बळ देतानाच काही स्थानिक नेत्यांना कानपिचक्याही दिल्या आहेत. 'आपल्यावर आरोप का होतात, याचाही शोध आरोप होणाऱ्यांनी घेतला पाहिजे,' असेही त्यांनी सुनावले. तसेच, 'आम्ही फार सुखाने नांदलो; पण तुम्हाला मोठे कष्ट घ्यावे लागणार आहेत,' असेही शिंदेनी सुनावले.

माजी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे म्हणाले, शहराध्यक्ष चेतन नरोटे रात्रंदिवस काम करतात. पण त्यांच्यावरही कधी कधी आरोप होतात. काम करणाऱ्या माणसांवर आरोप हे होणारच. पण, काम करणाऱ्यांनी आपल्यावर आरोप का होतात, याचाही शोध घेतला पाहिजे. मला खात्री आहे की, ते आरोप का होतात, याबाबत तेही सुधारतील.

मी अनेकदा दिल्ली-मुंबईत असतो. मला अनेक कार्यकर्त्यांचे फोन येतात. मी सर्वांचे फोन घेतो. फोन न घेणं किंवा कोणाकडे तरी फोन देणे हे मी कधीच करत नाही. आताच्या सर्व मंत्र्यांचे फोन हे त्यांच्या पीएकडे असतात. कुठे काय झाले, हे तुम्हाला काय कळणार आहे. अशा कार्यकर्त्यालां लोक बाजूला काढतात. कुणाच्या टीकेला घाबरू नका. आपले काम करत राहा. आम्ही सर्वजण तुमच्यासोबत आहोत, असा



विश्वासही सुशीलकुमार शिंदे (Sushilkumar Shinde) यांनी स्थानिक नेत्यांना दिला.

ते म्हणाले 'काँग्रेस पक्षाच्या नव्या पदाधिकाऱ्यांना आता खूप काम करावं लागणार आहे. एखाद-दुसरा प्रसंग सोडला तर आम्ही खूप सुखाने नांदलेले लोक आहोत.

पण, नव्या लोकांना अतिशय कष्टाने काम करावे लागणार आहे. मोठ्या कठीण परिस्थितीत तुम्ही मोठ्या उत्साहाने ते पद स्वीकारलेले आहे. तुम्हाला रात्रंदिवस काम करावं लागेल. तुम्हाला काँग्रेस वाढवावी लागेल.

नव्याने होणाऱ्या प्रभाग रचनेकडे सर्वांनी लक्ष ठेवले पाहिजे.

अध्यक्ष सांगतात, त्यानुसार सर्वांनी प्रामाणिकपणे काम केले पाहिजे. कारण ते सोनिया गांधी, राहुल गांधी यांनी दिलेला आदेशच खाली सांगत असतात. त्यामुळे यात ढिलेपणा असता कामा नये. जिल्हाध्यक्ष, तुम्हाला दिलेली तलवार आणि चिलखत घेऊन लढावं लागणार आहे. मला खात्री आहे की, पुन्हा आपली काँग्रेस सत्तेवर येणार आहे, असा विश्वासही शिंदे यांनी बोलून दाखवला.

शिंदे म्हणाले, आपल्यातील मतभेद बाजूला ठेवून नेहमी दक्ष राहिले पाहिजे. कोणी कोठेही गेले तरी आपण तत्वाने लढलो तर सोलापूर जिल्ह्यात काँग्रेस उभी राहील. मध्यंतरीच्या काळात आपले काही सहकारी इकडे तिकडे पळाले.

पण आता तेही होणार नाही. शेतकरीही कठीण परिस्थितीत उभा आहे. पण, केंद्र आणि राज्य सरकारमधील लोक हे बोलतात एक आणि करतात दुसरं, त्यामुळे शेतकरीही चिडलेला आहे.

कालपर्यंत जे झालं ते आता विसरा आणि आजपासून काँग्रेस पक्षाचा मी मालक आहे, या भूमिकेतून काम करा. आपले जिल्हाध्यक्ष सातलिंग शटगार हे दिसतात तगडे, ते काँग्रेस पक्षही तसाच उभे करतील. याबाबत माझ्या मनात शंका नाही, अशी भावनाही शिंदे यांनी बोलून दाखवली.

## संपादकीय

# जीएसटी सुलभीकरण

देशात गेल्या आठ वर्षापासून लागू असलेली वस्तू व सेवा करप्रणाली म्हणजेच जीएसटी करप्रणाली अधिक सुलभ करण्यासाठी त्यातील करांचे टप्पे कमी करण्याचा मनोदय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 15 ऑगस्टला लाल किल्ल्यावरील भाषणात व्यक्त केला होता. त्या पाठोपाठ लगेचच संबंधित मंत्रिगटाने बैठक घेऊन सध्या जीएसटी करप्रणालीमध्ये लागू असलेले चार टप्पे कमी करून फक्त 5 टक्के आणि 18 टक्के हे दोनच कर टप्पे राहतील अशी शिफारस केली आहे. नजीकच्या काळामध्ये जेव्हा जीएसटी परिषदेची बैठक होईल तेव्हा मंत्रिगटाची शिफारस मान्य केली जाऊन या निर्णयावर अंतिम शिक्कामोर्तब केले जाईल आणि देशातील कोट्यवधी नागरिकांसाठी अनेक वस्तू स्वस्त दरात उपलब्ध होतील. करशास्त्रातील नियमाप्रमाणे कोणतीही करप्रणाली सुलभ आणि सोपी असणे गरजेचे आहे. पण जीएसटी करप्रणाली लागू झाल्यापासूनच गोंधळ निर्माण करणारी आणि किचकट वाटणारी ठरली होती. लोकसभेतील विरोधी पक्षनेते आणि काँग्रेसचे नेते राहुल गांधी नेहमीच जीएसटीचा उल्लेख गब्बरसिंग टॅक्स असा करतात. काँग्रेसचा या जीएसटी करप्रणालीला विरोध होता. कारण, जीएसटीतील सर्वोच्च करटप्पा 18 टक्के असावा हीच मागणी काँग्रेस पहिल्यापासून करत होती आणि आता नव्या करप्रणालीप्रमाणे सर्वात मोठा टप्पा 18 टक्के असणार आहे. काही अपवादात्मक वस्तूंसाठी कदाचित 40 टक्क्यांचा टप्पा निर्माण केला जाऊ शकतो. साहजिकच काँग्रेसची मागणी सरकारने मान्य केली आहे, असे दिसते. सरकारच्या या निर्णयामुळे काही वस्तू स्वस्त होणार हे तर उघड दिसत आहे. कारण 12 टक्के आणि 28 टक्के हे दोन टप्पेच आता रद्द होणार असल्यामुळे 28 टक्के टप्प्यातील वस्तू 18 टक्के किंवा 5 टक्क्यांमध्ये येऊ शकतात आणि 12 टक्के टप्प्यातील वस्तू 5 टक्के करटप्प्यामध्ये येऊ शकतात. एवढ्या मोठ्या प्रमाणात करांचा टक्का घसरला असल्यामुळे सामान्य वापराच्या अनेक वस्तू स्वस्त होणार हे गृहीत आहे. मुळात सरकारच्या जीएसटी धोरणाप्रमाणे शून्य टक्के हा एक टप्पा आहे, ज्याच्यामध्ये ज्या वस्तूंवर शून्य टक्के जीएसटी आहे अशा काही वस्तू आहेत. काही संपूर्ण करमुक्त वस्तू आहे ज्यांच्यावर जीएसटी लागू होत नाही. आता यापुढे फक्त दोनच कर टप्पे असल्यामुळे जीएसटीचा जो बडगा सर्वसामान्य नागरिकांना आणि व्यापार्‍यांनाही वाटत होता तो कमी होणार आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे जीएसटीच्या माध्यमातून व्यवहार करणार्‍या कोट्यवधी व्यापार्‍यांचे करविषयक कामही सुलभ होणार आहे. जीएसटी लागू झाल्यापासून या करप्रणालीवर किचकटपणाचा आरोप होत होता. अजूनही या प्रणालीतील अनेक विषय स्पष्ट झालेले नाहीत. आता कराचे फक्त दोन टप्पे करून सरकारनेही संपूर्ण प्रणाली अधिक सुलभ करण्याच्या दृष्टीने पहिले पाऊल टाकले आहे, हे मान्य करावे लागेल. अर्थात, जेव्हा कोणत्याही प्रकारच्या करामध्ये कपात केली जाते तेव्हा त्याचा परिणाम महसूल कमी होण्यावर होतो हेसुद्धा गृहीत धरावे लागते. सरकारच्या निर्णयानंतर सरकारच्या तिजोरीमध्ये तब्बल 85 हजार कोटी रुपयांची घट होईल, असा एक अंदाज आहे. तेवढ्या प्रमाणात राज्यांचा महसूल कमी होणार आहे. अर्थात, करटप्पे कमी झाल्यामुळे आणि वस्तू स्वस्त झाल्यामुळे उलाढाल वाढेल आणि आपोआपच करांचे उत्पन्नही वाढेल, असा दावाही करतज्ज्ञ करत आहेत. काहीही असले तरी ही किचकट आणि गब्बरसिंग टॅक्स म्हणून संभावना होत असलेली करप्रणाली आता अधिक सुलभ आणि ग्राहकांना आकर्षक वाटणारी आणि व्यापार्‍यांना सोयीची ठरणारी होत असल्यामुळे सरकारच्या या निर्णयाचे स्वागतही करावे लागेल. गेल्या काही वर्षापासून सरकार सातत्याने करप्रणाली अधिक सुलभ करण्याकडे लक्ष देत आहे. नवे आयकर विधेयकही लोकसभेत मांडण्यात आले आहे. या माध्यमातूनही आयकर विषयक अनेक तरतुदी सुलभ करण्याचा सरकारचा विचार आहे आणि आता अप्रत्यक्ष करासाठी लागू असलेली जीएसटी करप्रणालीसुद्धा किमान करटप्प्यांच्या माध्यमातून अधिक सुलभ करण्यात आली आहे. जो महसूल कमी होणार आहे त्याला कोणता पर्याय शोधायचा याचा विचारही सरकारने केला असेलच. महागड्या कार्स, तंबाखूसारखे पदार्थ यांवर 40 टक्के सर्वोच्च कर लागू करून सरकार आपल्या करमहसुलामध्ये वाढ करू शकते. पण राज्यांचा जो महसूल कमी होणार आहे त्याची भरपाई कशी करायची याचा विचारही सरकारला करावा लागणार आहे. जीएसटी करप्रणाली जेव्हा लागू झाली तेव्हा सेल्स टॅक्सप्रणाली रद्द करून ही लागू करण्यात आली तेव्हा अनेक राज्यांचे नुकसान होणार होते. तेव्हा कॉम्पेन्सेशन सेसच्या माध्यमातून राज्यांचे नुकसान भरून काढण्यात आले होते. आता या नवीन सुधारणेनंतर अशा प्रकारचा एखादा विचार सरकार करणार आहे का, हेही पहावे लागेल. अर्थात, काही झाले तरी ही करसुधारणा निश्चितच महत्त्वाची आहे. सर्वसामान्य नागरिकांना त्याचा फायदा होणार आहे आणि व्यापार्‍यांना होणारा मनस्तापही काही प्रमाणात कमी होणार आहे. त्यामुळे सरकारच्या या करसुधारणा निर्णयाचे निश्चित स्वागत करावे लागेल.

# गरिबीचे चटके सोसल्याशिवाय माणूस मोठा कसा होईल?

माणसाला जीवनात जर मोठं व्हायचं असेल तर अगोदर गरिबीचे अनंत चटके हे सोसावेच लागतात. गरिबीतून प्रवास केल्याशिवाय यशाचे ठिकाण सापडणे शक्य नाही. गरिबीतून श्रीमंतीकडे म्हणजेच यशाकडे वाटचाल करण्यासाठी माणसाला गरिबीचे अनंत चटके तर सोसावेच लागतात परंतु अनेक वेगवेगळ्या संकटांना तोंड देत हा खडतर यशाचा प्रवास पूर्णत्वास न्यावा लागतो. त्यासाठी अनेकदा अपयशाचा, कित्येक खाच खळग्याचा व दुःखाचा सामना करावा लागतो. तेव्हा कुठे माणूस यशस्वी होऊन पैशाने व धनाने मोठा होतो. या जगात जी माणसे यशाला काबीज करून मोठ्या पदावर विराजमान झाली आहेत, त्यांनी अगोदर गरिबीचे अनंत चटके सोसून शून्यातून विश्व निर्माण केलेले असते. कोणताच माणूस सहजासहजी मोठा होत नसतो. अगोदर गरिबीचे चटके सोसल्याशिवाय यशाच्या गादीवर बसता येत नाही. जी माणसे गरिबीचे चटके सोसत यशाच्या दिशेने वाटचाल करतात तीच माणसे लवकर मोठी होतात. पण जी माणसे गरिबीला दोष देऊन तिथेच बसतात आणि यशाच्या दिशेने वाटचाल करायचे सोडतात, ती माणसे जीवनात कधीच यशस्वी होत नाहीत. जीवनात यशस्वी होण्यासाठी निरंतर व सातत्याने प्रयत्न करतच राहावे लागतात. परिस्थिती कितीही हालाखीची व बिकट असू द्या, काही फरक पडत नाही. पण समोरचा माणूस जर तिखट असेल तर तो परिस्थितीला लोळवल्या शिवाय राहत नाही. आतापर्यंतचा इतिहास आहे, जो माणूस शेवटपर्यंत प्रयत्नांची पराकाष्ठा करत राहिला, त्याच्या पदरात यशाचा पाऊस पडलाच आहे. यशाने त्याला कधीच हुलकावणी दिली नाही. हे कोणालाही नाकारता येणार नाही. पण काहीजण सातत्याने व निरंतर प्रयत्न न करता परिस्थितीला व गरिबीला दोष देऊन येणाऱ्या थोड्याफार अडचणींना व संकटांना घाबरून यशाची पुढील वाटचाल करायची थांबवतात. परिस्थितीला व नशिबाला नावे ठेवतात. एखाद्याने जर विचारले की, बाबा रे तू शिक्षण का थांबवलास? तर त्याला म्हणतात की, अहो काका माझी परिस्थिती तेवढी भक्कम नाही हो! माझे आईवडील शेतात काबाडकष्ट करून कसाबसा घर प्रपंच चालवतात आणि माझ्या शिक्षणाला ते कुठून पैसा लावतील? असे उत्तर त्यांच्याकडून हमखास ऐकायला मिळते. हल्ली शिक्षण अर्ध्यावर सोडणारी व शिक्षणाच्या प्रवाहातून दुरावलेली मुले शिक्षणाचे खापर आई-वडिलांच्या माथ्यावर फोडून मोकळे होतात. आई-वडिलांना व परिस्थितीला दोषी ठरवून त्यांची नाहक बदनामी करतात. खरे तर कोणतेच आई-वडील आपल्या मुलांना शिक्षण शिकवण्यास कमी पडत नाहीत. त्यासाठी परिस्थिती कितीही बिकट असू द्या, शिक्षण शिकवायची ऐपत नसताना देखील ते मुलांच्या शिक्षणासाठी सावकाराचे कर्ज काढतात, एखाद्याच्या शेतात सालगडी म्हणून नोकरी धरतात, घरातील सोन्याची दागिने गहाण ठेवतात पण आपल्या मुलांना शिक्षणासाठी पैसा लावतात. फक्त मुलांची शिकण्याची तयारी असायला हवी. पण मुलांना विनंती आहे की, शिक्षण सोडण्याचे खापर विनाकारण आई-वडिलांच्या माथ्यावर फोडू नका... नाहक परिस्थितीला दोष देत बसू नका...तुमच्यात शिक्षण शिकायची धमक नाही म्हणून सरळ सांगा ना...म्हणजे तुम्ही यशस्वी व्हाल याची शाश्वती तुम्हाला सुद्धा नाही असेच म्हणावे लागेल...माणसाला यशस्वी होण्यासाठी परिस्थिती कधीच आडवी येत नाही. माणूसच परिस्थितीला घाबरून माघार घेतो. मान्य आहे की, तुमची परिस्थिती फार बिकट व नाजूक आहे. म्हणून तुम्हाला अनेक अडथळ्यांचा व संकटांचा सामना करावा लागत आहे. गरिबीचे चटके सोसावे लागत आहेत. म्हणून तुम्ही शिक्षण अर्ध्यावर सोडून कुठेही भरकटत आहात. आई-वडिलांना व परिस्थितीला दोष देत आहात. आपल्याला यश सहजासहजी कसे मिळेल हो? त्यासाठी मेहनत, जिद्द व चिकाटी याची सांगड घालावी लागते. समोर येणाऱ्या संकटांना हिंमतीने तोंड द्यावे लागते. गरिबीचे चटके सोसावे लागतात. लोखंडाला घडवायचे असेल तर अगोदर त्याला भट्टीत गरम करावे लागते आणि मग त्याच्यावर घनाचे घाव घालावे लागतात. तेव्हा कुठे छानपैकी एखादी वस्तू आकाराला येते. मानवी जीवनाचे ही तसेच आहे. माणसाला जर जीवनात मोठे व्हायचे असेल, जीवन ध्येय गाठायचे असेल तर अगोदर गरिबीचे विखारी चटके सोसावेच लागतात. तेव्हा कुठे माणूस मोठ्या उंचीवर पोहोचतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची परिस्थिती खरंच उच्च शिक्षण घेण्यासारखी होती का? बाबासाहेबांना शिक्षण घेत असताना किती आर्थिक व सामाजिक संकटांना तोंड द्यावे लागले, याचा विचार आपण केलाय का कधी? बाबासाहेबांची परिस्थिती जेवढी गरीब होती, तेवढी हल्ली तर आपली नाही ना? डॉ.बाबासाहेब आंबेडकर एकेक पावाचा तुकडा खाऊन शिक्षण शिकत राहिले...गरिबीचे व येथील सामाजिक व्यवस्थेचे विखारी चटके सोसत राहिले आणि यशस्वी होऊन परिस्थितीला व येथील व्यवस्थेला लोळवत राहिले. बाबासाहेबांनी शून्यातून विश्व निर्माण केले. भारतीय संविधान लिहून, दीन, दलित, शोषित, पीडित, वंचित आणि उपेक्षितांना न्याय मिळवून दिला... आज संपूर्ण जगात बाबासाहेबांची जयंती साजरी केली जाते...सगळ्या जगात बाबासाहेबांच्या नावाचा जयजयकार होतो...बाबासाहेबांनी गरिबीला दोष न देता परिस्थितीमुळे निर्माण होणारे गरिबीचे विखारी चटके सोसले म्हणून बाबासाहेब भारतीय घटनेचे शिल्पकार व आधुनिक भारताचे राष्ट्र निमार्ते आणि ज्ञानाचे प्रतीक म्हणून ओळखले जात आहेत....

म्हणून बांधवांनो, गरीब परिस्थितीमुळे खचून न जाता, गरिबीच्या चटक्याला न घाबरता परिस्थितीमुळे निर्माण होणारे विखारी चटके सहन करत चला...नक्कीच तुम्ही सुध्दा जीवनात यशस्वी होऊन मोठ्या उंचीवर पोहोचाल... आपोआपच लोक तुम्हाला मोठं करतील आणि तुम्ही सुद्धा मोठे व्हाल...त्यासाठी सातत्य, जिद्द, मेहनत व चिकाटी यांची सांगड घालून येणाऱ्या संकटावर हिंमतीने मात करावी लागेल...

– बुध्दभूषण चंद्रकांत कांबळे
खंडाळी ता.अहमदपूर जिल्हा लातूर
मो.7498715661

## प्रबोधन

# एकत्र कुटुंब : अवगुणांची खाण

एका सांस्कृतिक कार्यक्रमात अलीकडे पसायदानाने कार्यक्रमाची सांगता करण्याची टूम जुनी झाली असली तरी तशी ती अलीकडचीच आहे. पण ज्यांना ज्ञानदेवांची जुनी, दुर्बोध मराठी भाषा कळते, त्यांच्या मनात त्यानंतर पसायदानाविषयी विचारचक्र सुरू होतं. ज्ञानदेव हे भावनाशील कवी होते; हे जसं पसायदानावरून कळतं, तसंच त्यांच्या अपेक्षा पूर्ण करणारा समाज कधीही अस्तित्वात येणं शक्य नाही, हेसुद्धा विचारांती समजून चुकतं. ज्ञानदेव म्हणतात, दुरिताचे तिमीर जावो अर्थात, दुःखी लोकांचं दुःख दूर होवो, यात कितपत सत्य आहे? वास्तवदर्शी संत तुकाराम अशा प्रतिपादनाला बोलाचीच कढी, बोलाचाच भात। जेवूनिया तृप्त कोण झाला? असा सवाल करायचे. जगातील श्रीमंतीच्या दंशाने गरिबी कायमची बेशुद्ध झालेली आहे, हे साधं समाजशास्त्र ज्ञानदेवांना समजत नसावं. म्हणूनच त्यांनी पसायदानाचं दिवास्वप्न पाहिलं.

कवी केशवसुत म्हणतात ते खोटं नाही. ते म्हणतात, नरेचि केला किती हीन नर, समाजातील पाच टक्के सुखी लोकांनीच ९५ टक्के समाजाची सुखं हिरावून त्यांना गुलाम करून, चोवीस तास आपल्या सेवेत अडकवून त्यांची दुःखं वाढवली आहेत. श्रीमंतीच्या भक्कम घरात राहाणारी ही सुखी माणसं वृत्ती-प्रवृत्तीने कमालीची आक्रमक, क्रूर, निर्दयी, धूर्त, स्वार्थी, अनुदार, अविचारी आणि राक्षसीपणाची जोपासना करीत असतात. उलटपक्षी गरीब माणसं नाइलाजाने सोशिक, नको तितकी सहनशील, प्रेतवत शांत, सवयीने अल्पसंतुष्ट, निरुपाय म्हणून निरिच्छ, सदान्कदा भ्यालेली, लाचार, दैववादी आणि कायमची मुकाट झालेली असतात. ठेविले अनंते तैसेचि राहावे किंवा आले देवाजीच्या मना। तेथे कोणाचे चालेना असं नेभळट तत्त्वज्ञान उराशी कवटाळून ती कशी तरी जगतात आणि एके दिवशी मरतात. गरीब माणूस मेला की, सुटला बिचारा एकदाचा! असं त्याचे शहाणे सोबती उगीच म्हणत नाहीत. तो दुःखमुक्तीचा आनंद असतो.

कार्ल मार्क्स ह्या थोर पुरुषाने गरिबी हा एक सामाजिक रोग आहे हे शोधून काढलं आणि हे या रोगावरील क्रांती हे औषधही लिहून दिलं. पण हे औषध दुर्मीळ करण्यासाठी श्रीमंताची यंत्रणा सतत क्रियाशील असते, हेच मुळात त्या तत्त्वचिंतकाला कळलं नाही. म्हणूनच वर्गहीन समाजनिर्मितीचा त्याचा विचार हासुद्धा पसायदानाचा पाश्चिमात्य अवतारच ठरला.

आपल्या जीवनाच्या संदर्भात विचार करता श्रीमंतांविषयी द्वेष बाळगणं जितकं व्यर्थ आहे, तितकंच निराशेने पछाडून जाणंही व्यर्थच आहे. श्रीमंतांविषय द्वेषभावना बाळगल्यामुळे जी मीठ-भाकरी गरिबाने कष्टाने मिळवलेली असते, तिचीही चव तो हरवून बसतो. द्वेष किंवा निराशेने व्यापलेल्या मनात भूतदया, प्रेम, वात्सल्य, परोपकार, सहानुभूती, निःस्वार्थ सेवा, कृतज्ञता, बंधुभाव, सहिष्णुता अशा सात्त्विक आनंदो- त्पादक गुणांचं अंकुरणं, वाढणं थांबून माणूस अविचारी होतो. अविचारी मनाने जगणं हे जिवंतपणी मरणंच असतं. शहाणा मनुष्य अशा अवस्थेपासून स्वतःला दूर ठेवतो. स्वामी विवेकानंद म्हणतात, 'आज आपणाला माणूस घडवणाऱ्या धर्माची गरज आहे.' भगवान महावीर म्हणतात, 'पाशवी वृत्तीला पाशवी वृत्तीने उत्तर देणं म्हणजे आपली बौद्धिक दिवाळखोरी मान्य करणं होय.' केशवसुत परिस्थितीने गरीब होते, पण स्फूर्तीसारख्या कविता लिहून उसळणाऱ्या जीवनानंदाला सामोरं जायचे. ते लिहितात, काठोकाठ भरू द्या – प्याला, फेस भराभर उसळू द्या। प्राशन करता रंग जगाचे, क्षणोक्षणी ते बदलू द्या– याला म्हणतात जगणं. अशा जीवनानंदाच्या आड येण्याची हिम्मत कुबेरामध्येही नसते. जला दो, जला दो ये दुनिया म्हणणाऱ्या उद्रेकवाद्यांहून केशवसुतांचं जगणं अधिक समृद्ध आणि सत्त्वयुक्त असतं. परिस्थितीला भिऊन जगणाऱ्या गरिबांना इमर्सन म्हणतो, भीतीपासून मुक्तता हवी असेल तर ज्ञान मिळवा. त्याचसाठी प्राचार्य भोसले म्हणतात, 'जीवन पत्करता येणं, बदलता येणं आणि सुधारता येणं या विविध जीवनशक्ती आहेत.' त्यांच्या साधनेतच जीवनाचं साफल्य आहे. तेव्हा लक्षात ठेवा–

श्रीमंती – गरिबी । मोठे रोग दोन
करती हैराण । समाजाला ॥ १
श्रीमंती माजोर। गरिबी लाचार
नियंत्रणा पार दोन्ही रोग ॥ २
जगाच्या रक्तात । असे विषमता
दूषित या रक्ता । दवा नाही ॥ ३
श्रीमंतीच्या मागे। सारी राजसत्ता
गरिबाला त्रास । सदोदित ॥४
जगायचे आहे अशा या जगात
निर्वैर नि शांत होवोनिया ॥५
जोपासा आनंद। ज्ञानाचा, कलेचा
आनंद सेवेचा । थोर आहे ॥६
जीवनाचे साध्य । मुक्तता मनाची
बाधा वैषम्याची। राही दूर ।।७



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर-416012
92258 09071

पान १ वरून

## चलो मुंबई! शेवटची लढाई...

म्हणलं एकही मराठ्यांची अस्सल औलाद माघारी जायचं नाही. समाज गर्व वाटावा असं काम करबंदुका आहेत का?

डीजेवर आमचं पोट चालतंय का? बंद तर बंद, पुढचा काळ लक्षात ठेवा, जशास तसं. कुठं कुठं डिजे वाजतो तिथं बारीक लक्ष ठेवायला लागतो. विनाकारण कशाला लोकांना डिवचता., चाललंय ना शांततेत आमचं.

तुम्हाला बढती मिळावी म्हणून लढतोय हा पठ्ठ्या. समजा दुसऱ्याचा असला, तर कुठे ना कुठे होणारच आहे, डीजे वाजेल. गावागावात लोक आहेत आमचे. आयचं देवेंद्र फडणवीस त्याच्या. असले चिल्लर चाळे करायला लावतो व्हय डीवायएसपीला, शांततेत जायचंय, तुम्ही विनाकारण डिवचताय. डीजे काय विषय आहे का, फडणवीसचं ऐकून दंगल घडवायची होती का?

पोलीस असला तरी फडणवीसचं ऐकून भानगडीत पडू नका, कधी ना कधी सत्ता बदलेल. तेव्हा आम्ही नाव ध्यानात ठेवू. मला बोलायचं नव्हतं पण जिव्हारी लागलं. फडणवीसचं ऐकून लोकांना त्रास द्यायचा हे चांगलं नाही. पोलिसांनी आम्हाला त्रास देण्याऐवजी महादेव मुंडेचे आरोपी धरा. ते दाखवा आम्हाला असं आव्हान जरांगेंनी पोलिसांना दिलं.

मराठा आरक्षण दिलं नाहीत तर काय करणार ते आता मुंबईत येऊनच दाखवू. फडणवीस साहेबांनी डीजे बंद करायला लावले. ही चूक केली. ती करायला नको होती. 29 ऑगस्टला अंतरवालीतून सकाळी निघायचं. समाजाला डाग लागेल असं एकही पाऊल उचलायचं नाही. तुमच्या लेकराला उंचीवर न्यायचंय. मराठ्यांच्या पोरांनी चुकीचं काही करायचं नाही. दगडफेक, जाळपोळ करायची नाही. आजची महत्त्वाची बैठक आहे. बीडमधून मराठ्यांना सांगतो की लेकराबाळांचं वाटोळं झालंय, ते पुढच्या काळात होऊ द्यायचं नाही.

### पहिली भूमिका

मुंबईला सर्वांनी शांततेत जायचं. आपल्या शेजारी जरी कुणी तसं वागत असेल तर एकानेही पळायचं नाही. त्याला उचलायचा आणि पोलिसाच्या गाडीत फेकायचं. जाळपोळ करणारे आपली पैदास नाही लक्षात ठेवा. सरकारनेच षडयंत्र करून ते लोक आपल्यात घातलेत. वेळ पडली तर त्यांना आपल्या घोषणा करायला लावतील. आपल्याला खूश करण्यासाठी घोषणा देतील आणि त्यांचेच लोक फडणवीस देत नाहीत असं म्हणून दगडं हाणा म्हणतील. ते म्हणू शकतात, त्यामुळे आपल्यापासून पाच फुटावर दगडफेक झाली तरी सरळ चालायचं मुंबईच्या दिशेने.

### भूमिका दुसरी

बीडमधल्या प्रत्येक माणसानं घरी रहायचं नाही. मायबापहो शेवटची फाइट आहे. मराठ्यांच्या डोक्यावर आरक्षण घेऊन गुलाल उधळायचा. मागं फिरायचं नाही. बस झालं आता, कंटाळा आला. उपोषण करून करून फेस पडला. शेवट फाइट आता. सोडायचं नाही मैदान.

### तिसरी भूमिका

बीडसह महाराष्ट्रातल्या सगळ्या ग्रामपंचायत सदस्यांना फोन लावायचे. सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, चेअरमन, स्थानिक प्रतिनिधी, भावी नेत्यांनाही सांगायचं चला मुंबईला. यातले भावी अर्धे सोडून गेले. ते आपल्या पुढे जाणारेत. पण बाकीच्यांना सांगा फक्त मुंबईला चला.

### चौथं महत्त्वाचं काम

डॉक्टर, वकील, गुरुजी, श्रीमंत, नेते यांना सांगा गाड्या बाहेर काढा. जितका कर्मचारी वर्ग आहे त्यांनी सगळ्यांनी मुंबईला चला. लेकरांचे हाल चाललेत.

# 'पक्ष शाखा सचिव हा पक्षाचा मुख्य कणा'- कॉ. डॉ. अजित नवले

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** "भारतामध्ये वैचारिक मतभेदानंतर १९६४ साली भारताचा कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी) ची स्थापना झाली. या पक्षाचा शाखा सचिव हा मध्यवर्ती केंद्रबिंदू असून, तो पक्षाचा कणा आहे. त्याची निवड लोकशाही पद्धतीने केली जाते. पक्ष घटना आणि कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्याचे दायित्व शाखा सचिवावरच असते", असे प्रतिपादन माकपाचे राज्य सचिव कॉ. डॉ. अजित नवले यांनी केले.



ते पुढे म्हणाले की, "शाखा सचिव हा नेहमी शाखेतील अन्य सदस्यांशी सुसंवाद साधणारा, नियमित बैठक घेणारा, स्थानिक प्रश्नांवर चर्चा करणारा, पक्षाचे मुखपत्र व साहित्याचा प्रसार करणारा, तसेच जनतेला त्यांच्या सामाजिक-आर्थिक प्रश्नांची जाणीव करून देऊन त्यांना लढ्यात उतरविणारा असला पाहिजे. जनतेशी प्रामाणिक राहणे हा शाखा सचिवाचा सर्वात मोठे गुण आहे. विश्वास आणि सौहार्दपूर्ण भावनेतून कॉम्रेडशिप दृढ होते. ह्यकॉम्रेडह्ण म्हणजे सखा, जिवलग मित्र व सार्वजनिक जीवन जगणारा व्यावसायिक क्रांतिकारक. अशा सचिवामुळे शाखा मजबूत होते व पक्षाचा जनाधार वाढतो."

डॉ. नवले यांनी पक्ष शाखेचे महत्व अधोरेखित करताना सांगितले की, "शाखा म्हणजे पक्षाची रक्तवाहिनी आहे. सदस्यत्व स्वीकारताना घेतलेल्या शपथेनुसार शाखेतील प्रत्येक सदस्य आपले व्यक्तिगत हित बाजूला ठेवून व्यापक जनहिताला प्राधान्य देतो. सामूहिक निर्णय प्रक्रियेने घेतलेले निर्णय काटेकोरपणे राबविण्याचे पहिले कर्तव्य शाखा निश्चित करते.

"शाखेत स्थानिक ते राष्ट्रीय पातळीवरील राजकीय, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व सांस्कृतिक प्रश्नांवर विचारविनिमय केला जातो. सत्ताधारी पक्षांच्या जनता-विरोधी धोरणांची चर्चा केली जाते. यामुळे सदस्यांच्या ज्ञानात भर पडते, आकलनशक्ती वाढते आणि वैचारिक प्रगल्भता निर्माण होते. शाखा म्हणजे जनतेला लोकशाही, समाजवादी आणि धर्मनिरपेक्ष क्रांतीकडे नेणारे केंद्र आहे.

"आजच्या महाराष्ट्रातील बदलत्या राजकीय व सामाजिक परिस्थितीत माकपच्या शाखा सचिवांची जबाबदारी अधिक वाढली आहे. पक्षाने निश्चित केलेले कार्य पूर्ण करणे आणि जनवादी क्रांतीला उभारी देणे हेच आजचे महत्त्वाचे कार्य आहे". असे आवाहन डॉ. नवले यांनी केले.

# 1.60 कोटी रुपयांचा 692 किलो गांजा जप्त

## एक आरोपी अटकेत



**बार्शी (कटूसत्य वृत्त):-** आंतरराष्ट्रीय अंमली पदार्थ विरोधी दिनानिमित्त राबवण्यात येत असलेल्या मोहिमेअंतर्गत, पोलीस अधीक्षक श्री. अतुल कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली बार्शी पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. या कारवाईत पोलिसांनी 1 कोटी 60 लाख रुपयांचा तब्बल 692.945 किलो गांजा जप्त केला असून, एका आरोपीला अटक केली आहे. ही कारवाई बार्शी तालुक्यात भोयरे गावाजवळ करण्यात आली. मिळालेल्या माहितीनुसार, आगळगाव ते बार्शी रोडवर अंमली पदार्थांची वाहतूक होणार असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे बार्शी पोलिसांनी सापळा रचला. पोलिसांना MH 14 EC 4536 क्रमांकाची कार, MH 14 EM 9833 क्रमांकाचा टेम्पो आणि MH 43 V 8947 क्रमांकाचा ट्रक संशयास्पद स्थितीत येत असल्याचे दिसले. पोलिसांनी त्यांना थांबण्याचा इशारा करताच, कार आणि ट्रकचे चालक पळून गेले. मात्र, टेम्पोचा चालक अंकुश दशरथ बांगर (रा. भोयरे, ता. बार्शी) पळून जात असताना, पोलिसांनी त्याला पाठलाग करून ताब्यात घेतले.

पोलिसांनी टेम्पोची तपासणी केली असता, त्यात मोठ्या प्रमाणात गांजा आढळून आला.

## वात्रटिका

### मत चोरीचे राज

मतांची चोरी केली जातेय
हे नव्याने राज उलगडले...
आपली हार त्यांचा विजय
हे केवळ त्यामुळेच घडले..
कार्यकर्त्यांना कानमंत्र दिला
आता सतर्क राहिले पाहिजे...
हे काम त्यांचीच मक्तेदारी नाही
आपल्याला पण हे आले
पाहिजे...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
**8698067566**

पान १ वरून

## सकल मराठा मोर्चाचा एल्गार.....

येथे जोरदार तयारी करण्यात आलीय. क्रेनच्या माध्यमातून एक क्विंटल फुलाच्या हाराने जरांगे पाटील यांचे स्वागत होईल.

त्यानंतर महामार्गालगत निर्णायक बैठक होईल. मुंबईला जाण्यापूर्वी होणाऱ्या बैठक आणि सभेतून जरांगे पाटील सरकारला अंतिम इशारा देणार आहेत. आणि याचसाठी मोठ्या संख्येने मराठा समाज मांजरसुंबा येथे दाखल होत आहे.

## अतिवृष्टी व पुराच्या पाण्यामुळे.....

असेही त्यांनी निर्देशित केले.

जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी आज रात्री कृषी विभागाच्या जिल्हा, तालुका व ग्राम स्तरीय यंत्रणेची तसेच तहसीलदार प्रांताधिकारी यांची दूरदृश्य प्रणाली द्वारे अतिवृष्टी, पुराच्या पाण्यामुळे झालेल्या शेती पिकाच्या नुकसानीचे पंचनामे करण्याच्या अनुषंगाने आढावा बैठक घेऊन त्यात सर्व संबंधित अधिकाऱ्यांनी त्वरित करावेत असे आदेश त्यांनी दिले.

# आ. अभिजीत पाटील यांनी केली पूर परिस्थिती पाहणी

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** पिराची कुरोली, वाडीकुरोली, शेळवे, खेडभाळवणी, कौठळी,व्होळे, खेडभोसे, देवडे, पटवर्धन कुरोली, आव्हे, पेहे, सांगवी, बादलकोट, उंबरे, करोळे, कान्हापुरी या भागांमध्ये माढा विधानसभा मतदारसंघाचे आ. अभिजीत आबा पाटील यांनी पूर परिस्थितीची पाहणी केली.



यावेळी पंढरपूरचे तहसीलदार सचिन लंगोटे हे उपस्थित होते. प्रत्येक गावातील नुकसानीचे पंचनामे तत्काळ करण्यात यावे अशा सूचना आ. अभिजीत पाटील यांनी दिल्या. देवडे येथील पुराच्या पाण्यामुळे घर संसार उघड्यावर पडलेल्या नागरिकांना अत्यावश्यक वस्तूंचे किट देण्यात आलं..

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# स्थानिक स्वराज्य संस्थेतील महिला नेतृत्व हा सशक्तीकरणाचा क्रांतिकारी पाऊल- खा. प्रणिती शिंदे

**नवी दिल्ली,(वृत्त सेवा):-** भारताचे माजी पंतप्रधान भारतरत्न स्व. राजीव गांधी यांच्या जयंतीनिमित्त राजीव गांधी फाऊंडेशन आणि राजीव गांधी स्टडी सर्कल यांच्या संयुक्त विद्यमाने, कालनिधी हिस्ट्री असोसिएशन, शामाप्रसाद मुखर्जी कॉलेज, दिल्ली विद्यापीठ यांच्या सहकार्याने 'तळागाळातील लोकांचा आवाज : स्थानिक स्वराज्यातील महिला नेतृत्व' या विषयावर राष्ट्रीय शोध निबंध स्पर्धेचे आयोजन जवाहर भवन, नवी दिल्ली येथे करण्यात आले. या उपक्रमाचा उद्देश लोकशाही मजबूत करण्याच्या दिशेने स्व. राजीव गांधी यांच्या दृष्टिकोनाला उजाळा देणे हा होता.




या स्पर्धेत देशभरातून ९० हून अधिक विद्यार्थ्यांनी आपापले शोध निबंध (केस स्टडी) सादर केले. त्यापैकी सखोल मूल्यमापनानंतर निवडलेल्या शीर्ष २० विद्यार्थ्यांनी कार्यक्रमादरम्यान आपले अध्ययन सादर केले. यावेळी त्यांना बक्षिसे व प्रमाणपत्रे देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रमाला विशेष मान्यवर म्हणून राजस्थानचे माजी मुख्यमंत्री श्री. अशोक गहलोत, खासदार प्रणिती सुशीलकुमार शिंदे, माजी मंत्री मीनाक्षी नटराजन, वरिष्ठ पत्रकार निधी कुलपति आणि प्रा. साधना शर्मा उपस्थित होते.

या राष्ट्रीय केस स्टडी स्पर्धेत खासदार प्रणिती शिंदे यांनी आपले सखोल विचार आणि समृद्ध अनुभव मांडत विद्यार्थ्यांना खऱ्या अर्थाने प्रेरणा दिली. त्यांनी स्पष्ट केले की, स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांचा सहभाग हा केवळ प्रतिनिधित्वापुरता मर्यादित नसून सशक्तीकरणाच्या दिशेने टाकलेले एक क्रांतिकारी पाऊल आहे.

माजी पंतप्रधान स्व. राजीव गांधी यांनी महिलांना स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये आरक्षण देण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला होता. त्यांच्या दूरदृष्टीमुळे महिलांसाठी प्रतिनिधित्वाची नवी दारे खुली झाली आणि आज त्या सक्षम नेतृत्वाच्या रूपात उदयास येत आहेत.

या उपक्रमातून तळागाळातील नेतृत्व, महिलांचे सशक्तीकरण आणि लोकशाही बळकट करण्याच्या स्व. राजीव गांधींच्या दूरदृष्टीला ठळकपणे अधोरेखित करण्यात आले.

# व्हीजेएनटी समितीकडून जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या अभिनंदनाचा ठराव

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र विधानमंडळाच्या विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीच्या तीन दिवसीय दौऱ्यात जिल्हा प्रशासनाच्या कार्याची विशेष दखल घेण्यात आली. समिती प्रमुख आमदार सुहास कांदे व सर्व सदस्यांनी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या संकल्पनेतून सोलापूर जिल्ह्यात व्ही जे एन टी समाजासाठी आयोजित करण्यात आलेल्या 25 विशेष शिबिरांमधून वंचित नागरिकांना विविध मूलभूत सेवा उपलब्ध करून त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा यशस्वी प्रयत्न केल्या बद्दल त्यांचे अभिनंदन व कौतुकाचा ठराव मांडला व तो सर्वांनी एकमताने मंजूर केला.

या शिबिरांद्वारे विमुक्त जाती व भटक्या जमाती मधील नागरिकांना 1609 मतदान ओळखपत्रे, 1421 जात प्रमाणपत्रे, 517 आधार कार्ड, 19 दिव्यांग प्रमाणपत्रे, तसेच 914 आयुष्यमान भारत कार्ड वितरित करण्यात आले. विशेष म्हणजे, 62 लाभार्थ्यांना घरकुलासाठी मोफत जमीन वाटप करण्यात आली, ज्यामुळे या समाजघटकांना स्थैर्य व सन्मान प्राप्त झाला.

समितीने या उपक्रमाचा सविस्तर प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दिले असून, हा उपक्रम संपूर्ण राज्यात पथदर्शक प्रकल्प म्हणून राबविण्याची शिफारस करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी व्हीजीएनटी समाजासाठी घेतलेल्या पुढाकाराचे समितीने विशेष कौतुक केले असून, राज्यस्तरीय धोरणनिर्मितीत या अनुभवाचा उपयोग केला जाणार आहे.

# एमआयटी विश्वप्रयागमध्ये 'विश्वारंभ' स्वागत समारंभ उत्साहात संपन्न



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठात 'विश्वारंभ' हा यावर्षी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ उत्साहात पार पडला. कार्यक्रमाचे उद्घाटन एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठाच्या कार्यकारी अध्यक्षा प्रा. स्वाती कराड चाटे यांच्या हस्ते झाले. यावेळी कुलगुरू प्रा. गोपाळकृष्ण जोशी, संचालक राघवेंद्र एम. चाटे, अधिष्ठाता, प्राध्यापकवर्ग, कर्मचारी तसेच विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रथम शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला आयोजित या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांना विद्यापीठाची शैक्षणिक परंपरा, मूल्यव्यवस्था आणि भविष्यातील संधींविषयी मार्गदशन करण्यात आले. यावेळी सर्व नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत करताना प्रा. स्वाती कराड चाटे म्हणाल्या की, आजच्या स्पर्धात्मक युगात आधुनिक तंत्रज्ञान आणि व्यवसायिक यशावर भर देणाऱ्या शिक्षणामध्ये नैतिक मूल्यांची पायाभरणी आणि सामाजिक जाणीवेची दिशा आवश्यक आहे. तरच आपण संतुलित आणि शाश्वत विकास साधू शकतो. यासाठी एमआयटी विश्वप्रयाग मध्ये विद्यार्थ्यांना सजग आणि संवेदनशील नागरिक म्हणून घडविताना त्यांना आत्मकेंद्रित नव्हे, तर समाजकेंद्रित विचार करण्यासाठी प्रेरित केले जाते. आजच्या या 'विश्वारंभ' मधून सर्व विद्यार्थी याच प्रेरणादायी शैक्षणिक प्रवासाची सुरुवात करणार आहेत.

विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. गोपाळकृष्ण जोशी यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना विद्यापीठाची तत्वे, मूल्यव्यवस्था, शैक्षणिक दृष्टीकोन तसेच उपलब्ध संधीविषयी मार्गदर्शन केले. याबरोबरच विद्यार्थ्यांसाठी तज्ज्ञांचे मार्गदर्शन, संवादात्मक कार्यशाळा आणि सांस्कृतिक कार्यक्रम अशा विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पालकांसाठी आयोजित 'उच्च शिक्षणातील पालकत्व' या विशेष मार्गदर्शनपर चर्चासत्रात डॉ. स्मिता त्रिगुण कुलकर्णी - निवृत्त उपजिल्हाधिकारी तसेच मानसतज्ञ व समुपदेशक यांनी मार्गदर्शन करताना, विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी पालकांनीही विद्यापीठाबरोबर हातात हात घालून काम करण्याची आवश्यकता अधोरेखित केली. यानंतर प्रख्यात कलाकार प्रत्यक्ष राजभट्ट यांच्या थरारक 'रावणा' सादरीकरणाने सर्वांना मंत्रमुग्ध केले. विद्यार्थ्यांच्या 'बहुमुखी' विकासाठी विद्यापीठाची बांधिलकी अधोरेखित करणारा हा स्वागत समारंभ विद्यार्थी आणि पालकांच्या उत्स्फूर्त सहभागाने अविस्मरणीय ठरला.

# राजा माने यांना 'शांतीदूत' राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान



**पुणे (कटूसत्य वृत्त):-** संपादक, माध्यम तज्ज्ञ व राजकीय विश्लेषक राजा माने यांच्या पत्रकारितेतील योगदानाबद्दल त्यांना "शांतीदूत"हा मानाचा राज्यस्तरीय पुरस्कार देऊन गौरविण्यात आले."शांतीदूत" चे संस्थापक व निवृत्त आय पी एस अधिकारी डॉ. विठ्ठलराव जाधव यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

राजा माने हे डिजिटल मिडिया संपादक पत्रकार संघटना महाराष्ट्र व प्रतिबिंब प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष तसेच महाराष्ट्र शासनाच्या शंकरराव चव्हाण पत्रकार कल्याण निधी समितीचे सदस्य आहेत.गेली ४२ वर्षे ते महाराष्ट्राच्या पत्रकारितेत सक्रीय आहेत. या प्रसंगी सौ विद्याताई जाधव यांच्या हस्ते सौ मंदा माने यांचा ही सन्मान करण्यात आला. या वेळी डिजिटल मिडिया संपादक पत्रकार संघटना राज्य सचिव महेश कुगावकर, राज्य संघटक अमोल पाटील,पुणे शहर पदाधिकारी पराग डिंगनकर, शांतीदूत परिवाराचे महाराष्ट्र कार्याध्यक्ष सुरेश सपकाळ ,सचिव ,मधूकर चौधरी ,अध्यक्ष शिवाजी नगर शांतीदूत परिवार आदी उपस्थित होते.

# लाईफलाईन हॉस्पिटल पंढरपूर येथे अत्याधुनिक नेत्रसेवा विभागाचा आज शुभारंभ

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** पंढरपूर येथे लाईफलाईन हॉस्पिटल येथे अत्याधुनिक नेत्रसेवा विभागाचा उद्या सोमवार दिनांक 25 ऑगस्ट रोजी सकाळी 10 वा. मान्यवरांच्या उपस्थितीत शुभारंभ होणार असल्याची माहिती डॉ. विश्वजित देशमुख यांनी दिली.

लाईफलाईन हॉस्पिटल म्हणजे पंढरपूर येथील नामांकित वैद्यकीय उपचारासाठी प्रसिद्ध असणारे हॉस्पिटल असुन यामध्ये त्यांनी नव्याने अत्याधुनिक नेत्रसेवा विभागाचे सुरूवात करीत आहेत या नेत्रसेवा विभागाचे उद्घाटन सौ. शुभांगी व रमेशराव माणिकराव देशमुख यांच्या शुभहस्ते करण्यात येणार आहे.



तर यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून माजी आमदार प्रशांत परिचारक, आमदार समाधान आवताडे, आमदार अभिजित पाटील, माजी आमदार शहाजी बापु पाटील, आमदार बाळासाहेब देशमुख, चेअरमन कल्याणराव काळे, जिल्हा अध्यक्ष वसंत नाना देशमुख,माजी चेअरमन भगिरथ भालके, जयसिंग देशमुख, प्रशांत भैय्या देशमुख, डॉ.ऋतुजा उत्पात, डॉ.अमरसिंह जमदाडे, डॉ.अमितकुमार आसबे आदी मान्यवर यावेळी उपस्थित राहणार आहेत.

तरी सर्वांनी या नुतन अत्याधुनिक नेत्रसेवा विभागाचे उद्घाटन प्रसंगी उपस्थित रहावे असे हॉस्पिटल व्यवस्थापनाकडून करण्यात आले आहे.

# फीट इंडीया मिशन मध्ये सोलापूरकरांची सायकलोथॉन रॅली

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** भारत देशातील नागरिकांचे आरोग्य चांगले राहावे यासाठी क्रिडा मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांनी "फीट इंडीया मिशन" हा उपक्रम राबविण्यात येत आहे. वा उपक्रमामध्ये देशातील सर्व नागरिकांचा सहभाग राहावा यासाठी प्रशासकीय विभागातील सर्व घटकांना याबाबत वेगवेगळे उपक्रम राबविण्याबाबत सुचीत करण्यात आले आहे. मा. श्रीमती रश्मी शुक्ला, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी राज्यातील सर्व पोलीस घटकांना भारत सरकारच्या उपक्रमांमध्ये" सायकल रॅली घेण्याबाबत कळवले आहे.



दिनांक २४.०८.२०२५ रोजी पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर व पोलीस अधीक्षक कार्यालय, सोलापूर ग्रामीण यांच्या संयुक्त विद्यमाने "फीट इंडीया सायकल रॅली" आयोजीत करण्यात आली होती. सदरची सायलक रॅली ही १) ५० किलोमीटर २) २५ किलोमीटर ३) १० किलोमीटर या तीन टप्यामध्ये आयोजीत केली होती. रॅलीमध्ये सर्व नागरिकांनी सहभाग घेण्याबाबत मा.श्री. एम. राजकुमार, पोलीस आयुक्त, सोलापू शहर व मा. श्री. अतुल कुलकर्णी, पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण यांनी आवाहन केले होते. यावरून दिनांक २४.०८.२०२५ रोजी सोलापूर शहरातील चार हुतात्मा पुतळ्यापासून या रैलीस मा. श्री. प्रितम यावलकर, अपर पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण व मा. श्रीमती आश्विनी पाटील, पोलीस उपायुक्त, सोलापूर शहर यांनी हिरवा झेंडा दाखवून रॅलीस सुरूवात झाली.

सदरची रॅली ही सात रस्ता चौक, विजापूर रोडने सोरेगाव व नांदणी पेट्रोल पंप येथे जावून तेथून परत सात रस्ता चौक, रंगभवन चौक मार्गे पोलीस मुख्यालय, सोलापूर ग्रामीण येथे पोहचली. या रॅलीमध्ये मा.श्री. एम. राजकुमार, पोलीस आयुक्त, सोलापू शहर व मा. श्री. अतुल कुलकर्णी, पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण वांच्यासह मा. श्री. विजय कबाळे, पोलीस उपायुक्त (परीमंडळ) सोलापूर शहर यांनी प्रत्यक्ष सहभाग घेतला. तसेच सोलापूर शहर व ग्रामीण पोलीस दलातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांच्यासह सोलापूर शहरातील स्वामी विवेकानंद पब्लीस स्कूल येथील विद्यार्थी, सोलापूर सायकल लव्हर्स या ग्रुपसह सुमारे १००० सायकलपटूनी सहभाग नोंदवला आहे. या रॅलीमधून नागरिकांना आपले आरोग्य चांगले व तंदुरूस्त राखण्याबाबतचा संदेश पोहचविण्यात आला. पोलीस मुख्यालय, सोलापूर ग्रामीण येथे या रॅलीचा समारोप कार्यक्रम करण्यात आला. यावेळी मा.श्री. एम. राजकुमार, पोलीस आयुक्त व मा.श्री. अतुल कुलकर्णी, पोलीस अधीक्षक यांनी पोलीस खात्यातील अधिकारी व अंमलदार यांना दैनंदिन कर्तव्य करताना अनेकदा तणावाचा सामाना करावा लागतो. अशा वेळी नियमीत व्यायाम व संतुलीत आहार घेतल्यास आपले आरोग्य चांगले राखता येते. तरी पोलीस विभागातील अधिकारी व अंमलदार यांच्यासह नागरिकांनी आरोग्य चांगले ठेवावे असा सल्ला दिला, या फिट इंडीया सायकल रॅलीमध्ये सहभागी सायकलपटू यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र व मेडल (पदक देवून सन्मानीत करण्यात आले.

सदरचा कार्यक्रम हा मा.श्री. एम. राजकुमार, पोलीस आयुक्त, सोलापूर शहर, मा.श्री. अतुल कुलकणी, पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण, मा.श्री. प्रितम यावलकर, अपर पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण, मा.श्री. विजय कवाडे, पोलीस उपायुक्त, मा. श्रीमती आश्विनी पाटील, पोलीस उपायुक्त, मा.श्री. शिरीष हुंबे, पोलीस उपअधीक्षक (मुख्यालय) सोलापूर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. शरद बारवकर, राखीव पोलीस निरीक्षक, सोलापूर शहर, श्री. राकेशकुमार ढाकणे, राखीव पोलीस उपनिरीक्षक, सोलापूर ग्रामीण व पोकों प्रशांत म्हमाणे, मपोकों मोनिका एकबोटे, मानव संसाधन विभाग सोलापूर ग्रामीण यांनी योग्य समन्वय ठेवून पार पाडला आहे.

# सोलापूरच्या बालाजी सरोवर प्रीमियरला 'हॉटेल ऑफ द इयर' पुरस्काराने सन्मानित

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूरच्या बालाजी सरोवर प्रीमियर या पंचतारांकित हॉटेलने पुन्हा एकदा आपली छाप पाडत प्रतिष्ठेचा 'हॉटेल ऑफ द इयर २०२४' हा मानाचा पुरस्कार पटकावला आहे. श्रीपेरंबदूर येथे झालेल्या भव्य SYNC २०२५ या समारंभात हा पुरस्कार देण्यात आला तसेच हॉटेलचे चीफ इंजिनिअर महांतेश तोळणुरे यांना 'चीफ इंजिनिअर ऑफ द इयर' या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.हा पुरस्कार सरोवर हॉटेल्सचे चेअरमन अजय बकाया, सीईओ जतिन खन्ना, तसेच लूव्हर हॉटेल्स ग्रुपचे बोर्ड डायरेक्टर फेडेरिको जे. गॉन्झालेझ यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. 'हॉटेल ऑफ द इयर २०२४' पुरस्कार हॉटेलचे महाव्यवस्थापक विवेक जोशी यांनी स्वीकारला, तर 'चीफ इंजिनिअर ऑफ द इयर'पुरस्कार स्वतः महांतेश तोळणुरे यांनी स्वीकारला. भारतातील तब्बल १५० हून अधिक हॉटेल्समधून आलेल्या नामांकनांमध्ये बालाजी सरोवर प्रीमियरची निवड करण्यात आली. उत्कृष्ट सेवा, ग्राहक समाधान आणि जागतिक दर्जाच्या सुविधा यामुळे या हॉटेलने सोलापूरच्या आदरातिथ्य क्षेत्रात अल्पावधीतच वेगळी ओळख निर्माण केली आहे.या यशाचा आनंद साजरा करण्यासाठी हॉटेलमध्ये विशेष सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. यावेळी सोलापूरचे नामवंत वास्तुविशारद मनोज मर्दा यांच्या प्रमुख उपस्थितीत बालाजी अमाईन्स लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक राम रेड्डी यांनी महाव्यवस्थापक विवेक जोशी आणि चीफ इंजिनिअर महांतेश तोळणुरे यांचा विशेष सत्कार केला.



याप्रसंगी माध्यमांशी बोलताना रेड्डी म्हणाले, 'हा सन्मान म्हणजे व्यवस्थापन आणि संपूर्ण टीमच्या कठोर परिश्रमांचे प्रतीक आहे. आमचे ध्येय नेहमीच अतिथींना सर्वोत्तम सेवा देणे हेच राहिले असून, या पुरस्कारामुळे आमच्या टीमचा उत्साह अधिक वाढला आहे.'

**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अॅडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

-: संपर्क :-
8083608083
9922646566
8698732109

(सरकार मान्य)
**अथर्व पेस्ट कंट्रोल**
An ISO 9001-15
सर्टीफाईड कंपनी
प्रोप्रा. हरी सुभाष विरपे
9822964815
9421984815
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

**सोलापूर महानगरपालिका, सोलापूर**
पत्ता-इंद्रभुवन, पुण्यश्लोक आवासाहेब वारद पथ,
रेल्वेलाईन्स, सोलापूर ४१३००१
नगर अभियंता कार्यालय, रस्ते विभाग, सो.म.पा., मो.नं. 9423992748

जा.क्र.नगर अभियंता/रस्ते विभाग/2025-26/1118 दि. 22/08/2025

**ई निविदा सूचना क्र. /2025-26**

सोलापूर महानगरपालिका, सोलापूर नगर अभियंता कार्यालय रस्ते विभागाकडून महानगरपालिका क्षेत्रात राष्ट्रीय स्वच्छ वायू कार्यक्रम 25- 26 अंतर्गत खालील कामाचे ई- निविदा बाबत.

1) टेंडर आय डी- 2025_SMC 1212908_1 2) टेंडर आय डी- 2025_SMC_1212914 3) टेंडर आय डी- 2025_SMC_ 1212915 4) टेंडर आय डी- 2025_SMC_ 1212919_1

वरील कामाचे निविदा http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि. 25/08/2025 ते दि.02/09/2025 पर्यंत भरणेस उपलब्ध आहे.

सही/-
प्र. नगर अभियंता
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

(नोंदणी क्र.: एसयुआर/एमएचएल/ पीआरडी (आय) / ९०६/८६ दि. १२/०२/१९८६)

**चंद्रमौळी औद्योगिक सहकारी वसाहत मर्यादित मोहोळ ता. मोहोळ**

**वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस**

**(फक्त सभासदाकरिता)**

सन्माननीय सभासद बंधु भगिनींनो,

चंद्रमौळी औद्योगिक सहकारी वसाहत मर्यादित मोहोळ तालुका मोहोळ जिल्हा सोलापूर या संस्थेची ४० वी वार्षिक सर्वसाधारण सभा मंगळवार दिनांक ०९/०९/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता मोहोळ नागरी सहकारी पतपुरवठा संस्था मर्यादित मोहोळ. मुख्यालयाचे सभागृह, मार्केट यार्ड, मोहोळ येथे खालील विषयांवर चर्चा करुन निर्णय घेणेसाठी आयोजित केली आहे. तरी सर्व सभासदांनी उपस्थित रहावे, ही विनंती.

**- सभेपुढील विषय -**

१) मागील वर्षी दिनांक २४/०९/२०२४ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या कामकाजाचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२) मा. संचालक मंडळाचा अहवाल व मा. लेखा परिक्षकाकडून तपासून आलेला दि. ३१/०३ /२०२५ अखेरचा ताळेबंद व नफा-तोटा पत्रक वाचून स्विकृत करणे.
३) मा. संचालक मंडळाने सुचविलेल्या दि. ३१/०३ /२०२५ अखेरच्या नफा वाटणीस मंजूरी देणे.
४) सन २०२५-२०२६ या वर्षासाठीचे अंदाजपत्रकास मंजूरी देणे व मागील वर्षी अंदाजापत्रकापेक्षा जादा झालेल्या खर्चास मंजूरी देणे.
५) अंतर्गत लेखापरिक्षकाची नेमणूक करणे व मेहनताना ठरविणे.
६) वैधानिक लेखापरिक्षकाची नेमणूक करणे व मेहनताना ठरविणे.
७) लेखा परिक्षण अहवाल दोष दुरुस्ती करणे व पुर्तता करणे.
८) वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असणाऱ्या सभासदांची क्षमापित करणे.
९) मा. अध्यक्ष यांचे परवानगीने येणाऱ्या आयत्या वेळचे विषयांवर चर्चा करणे. मा. संचालक मंडळाचे आदेशावरुन

स्थळ : मोहोळ
दिनांक : २५/०८/२०२५

**ए. एस. नाईक** – प्र. व्यवस्थापक
**कौशिक संदिपान गायकवाड** – चेअरमन
चंद्रमौळी औद्योगिक सहकारी वसाहत मर्यादित, मोहोळ जि. सोलापूर

**विशेष सुचना :**

१) गणपूर्ती (कोरम) अभावी सभा तहकूब झाल्यास सदर वार्षिक सर्वसाधारण सभा त्याच अध्य तासानंतर ठिक ११.३० वा. त्याच ठिकाणी, त्याच विषयांवर चर्चा करणेसाठी होईल. सदर सभेस गणपूर्ती (कोरम) ची आवश्यकता असणार नाही.
२) संस्थेच्या कामकाजासाठी प्रश्न किंवा माहिती आवश्यक असल्यास दि. ०२/०९/२०२५ पर्यंत संस्थेच्या कार्यालयात लेखी स्वरुपात द्यावी. ऐनवेळी उपस्थित केलेल्या प्रश्नाविषयी अशी माहिती उपलब्ध करुन देणे केवळ अशक्य आहे.
३) सभासदांचा पत्ता बदललेला असल्यास व वारस नेमणूक केली नसल्यास संस्थेच्या कार्यालयात करावी.
४) संस्थेच्या सभासद भागीदारी, सहकारी कंपनी, न्यास आदी संस्थेच्या वतीने सभेस उपस्थित राहणाऱ्या प्रतिनिधींची नियुक्ती ठरावाद्वारे करावी व सभेस येताना संबंधित ठराव सोबत आणावा.
५) वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस, ही प्रत्येक सभासदांनी सभेस येताना सोबत आणावी, त्याशिवाय प्रवेश मिळणार नाही. याची नोंद घ्यावी.

# डीजेमुक्त सोलापूर अभियानासाठी आज निघणार डॉक्टरांची रॅली



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** डीजेमुक्त सोलापूर अभियानासाठी आत्ता शहरातील डॉक्टरांच्या विविध संघटना पुढे सरसावल्या आहेत. सोमवारी (२५ ऑगस्ट) सकाळी साडेदहा वाजता ऑफिसर क्लब ते पोलीस आयुक्तालय या मार्गावरून डॉक्टरांची रॅली निघणार आहे. त्यानंतर आयुक्तांना शाश्वत डीजे बंदीसाठी निवेदन देण्यात येणार आहे.

डीजेमुक्त सोलापूर कृती समितीच्या नेतृत्वाखाली या रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये इंडियन मेडिकल असोसिएशन, निमा (नॅशनल इंटिग्रेटेड मेडीकल असोसिएशन), हॉस्पिटल ओनर्स असोसिएशन, होमिओपॅथी असोसिएशन, इंडियन डेंटल असोसिएशन, इंडियन असोसिएशन ऑफ फिजिओथेरपी या संघटना सहभागी होणार असल्याचे डीजेमुक्त सोलापूर कृती समितीचे अध्यक्ष अॅड. धनंजय माने यांनी सांगितले.

शहरात डीजे मूक्त सोलापूर कृती समितीच्या वतीने या गणेशोत्सवापासून डीजे कायमचा बंद करावा यासाठी आंदोलने सुरु झाली आहेत. सुरवातीला ज्येष्ठ नागरिक संघांनी मोर्चा काढला. त्यानंतर आता आयएमए संघटनेने या विरोधात आवाज उठवून डीजे आरोग्यास घातक असल्याची भूमिका मांडली. निमाने त्यांच्या सदस्यांची डीजे विरोधात स्वाक्षरी मोहीम सुरु केली. आतापर्यंत २०४ डॉक्टरांनी त्यावर स्वाक्षऱ्या केल्या आहेत. हॉस्पिटलमध्ये दाखल होणाऱ्या अत्यवस्थ रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना रस्त्यावरील डीजेचा त्रास असह्य होऊ लागला आहे. डीजेचा त्रासातून सोलापूर शहर मुक्त व्हावे अशी भूमिका घेऊन या संघटना पोलिस आयुक्तांकडे मागणी करणार आहेत.

अधिकाधिक डॉक्टरांनी या आंदोलनात सहभागी व्हावे असे आवाहन डीजेमुक्त सोलापूर कृती समितीचे अध्यक्ष अॅड. धनंजय माने, आयएमएच्या अध्यक्षा डॉ.मंजुषा शहा, निमाचे सोलापूर शाखा अध्यक्ष, डॉ. नागनाथ जिड्डीमनी, हॉस्पिटल ओनर्स असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. संजय मंठाळे व होमिओपॅथी डॉक्टर संघटनेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. सुनील वरळे, इंडियन डेंटल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. कौस्तूभ तांबेकर यांच्यासह विविध वैद्यकीय संघटनांनी केले आहे.

# विवाह सोहळयात डामडोल नको; साधेपणा हवा
## मराठा वधू-वर मेळाव्यात समाजाचा निर्णय
## शहर जिल्ह्यातील चारशे वधू-वरांची उपस्थिती

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** मराठा सेवा संघाच्या वतीने आयोजित मराठा वधू-वर परिचय मेळाव्यात सोलापूर शहर जिल्ह्यातील वधू-वर आणि पालकांनी मोठा प्रतिसाद दिला. तब्बल चारशे वधू-वरांची उपस्थिती मेळाव्यास होती. आई-वडिलांनी आपल्या पाल्यांचा विवाह करताना विवाह सोहळ्याचा डामडौल न करता साधेपणाने सोहळा करावा असा सूर उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केला.

रविवार दि.24 ऑगस्ट रोजी आरटीओ ऑफिस जवळ असलेल्या आदित्य नगर सांस्कृतिक भवन येथे मराठा समाजाचा 31 वा वधू- वर परिचय मेळावा पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पुणे विभागीय अध्यक्ष प्रशांत पाटील, प्रमुख पाहुणे म्हणून मराठा नागरि पतसंस्थेचे चेअरमन तथा शिवसेना जिल्हाप्रमुख अमोल शिंदे, जिजाऊ ब्रिगेडच्या उज्वलाताई साळुंखे, जिल्हाध्यक्ष डॉ.जी. के. देशमुख, शहराध्यक्ष सूर्यकांत पाटील उपस्थित होते.

यावेळी विचारपीठावर संभाजी ब्रिगेडचे सोमनाथ राऊत, प्रकाश ननवरे, दिनकर देशमुख, दत्ता जाधव, राजू व्यवहारे, राम माने ,हनुमंत पवार, आर. पी. पाटील, तानाजी चटके, नागनाथ पवार, सुशील गवळी ,अंबादास सपकाळे ,लिंबराज जाधव परशुराम पवार, शिरीष भोसले, पांडुरंग झांबरे,आदी मान्यवर उपस्थित होते.



मेळाव्यास आलेल्या वधू वर यांच्या बायोडाटाचे वाचन अंजली जाधव, संजीवनी मुळे, प्रज्ञा भोसले, लता ढेरे.यांनी केले. तर नोंदणीसाठी .. वैभवी पवार, श्रावणी माने, राजू व्यवहारे,. सागर रेवडकर., मेजर मोहिते, कारंडे, प्रभाकर शिंदे... यांचे सहकार्य लाभवले.

कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रमाता जिजाऊ मातांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. गोवर्धन गुंड यांनी जिजाऊ वंदना सादर केली.

मराठा सेवा संघाचे उपाध्यक्ष सदाशिव पवार यांनी वधू-वर परिचय मेळावा घेण्यामागची भूमिका आपल्या प्रास्ताविक भाषणातून विशद केली.

पुणे विभागीय अध्यक्ष प्रशांत पाटील यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात मराठा समाजामध्ये नव्हे तर इतर समाजामध्ये देखील मुलींची संख्या कमी होत असल्याची बाब चिंताजनक आहे. पालकांनी आपल्या मुलाचा अथवा मुलीचा विवाह ठरवताना संपत्ती अथवा पॅकेज कडे न पाहता स्वकर्तृत्व पाहून विवाह करावेत. पत्रिकेवर अवलंबून राहू नये असे मार्गदर्शन केले.

अमोल शिंदे यांनी विवाह सोहळे करताना पालकांनी कोणताही डामडौल न करता साधेपणाने विवाह सोहळे साजरे करावेत. मुलगी देताना मुलांचे कर्तुत्व पाहावे तरच समाजाच्या वतीने घेण्यात येर्णाया वधू-वर परिचय मेळाव्याचा उद्देश सफल होईल असे सांगितले.

डॉ.जी. के. देशमुख , सूर्यकांत पाटील ,उज्वला साळुंखे यांचे देखील मार्गदर्शन झाले. मुलांची लग्न जमण्यास अडचणी येत आहेत. पालकांनी मुलगी देताना फार मोठ्या अपेक्षा ठेऊ नये. कर्ज काढून विवाह सोहळे साजरे करू नये असे मत व्यक्त केले.कार्यक्रमाचे सुत्रसंचालन लक्ष्मण महाडिक यांनी केले तर आभार हणुमंत पवार यांनी मानले, मेळावा यशस्वी करण्यासाठी नवनाथ कदम, अविनाश गोडसे, दीपक शेळके, कल्याण गव्हाणे सचिन चव्हाण. प्रकाश डोंगरे, रमेश जाधव ,नितीन मोहिते, राजू मिरकले, रुपेश भोसले यांनी परिश्रम घेतले

# बाळे शिक्षक पतसंस्थेच्या चेअरमनपदी तात्यासाहेब काटकर



**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्हा माध्यमिक शिक्षक व सेवक सहकारी पतसंस्था बाळे सोलापूरच्या चेअरमनपदी माळशिरस तालुक्याचे संचालक तात्यासाहेब शिवाजी काटकर यांची तर व्हाइस चेअरमनपदी शिवाजी थिटे यांची एकमताने, पुणे विभागाचे शिक्षक आमदार दत्तात्रय सावंत यांच्या नेतृत्वाखाली व मार्गदर्शनाखाली सर्व संचालक मंडळाने निवड केली. गेली अनेक वर्षे हि पतसंस्था शिक्षक आमदार दत्तात्रय सावंत यांच्या नेतृत्वाखाली व मार्गदर्शनाखाली पारदर्शक व्यवहार करीत आहे.

100 कोटींची उलाढाल असलेल्या पतसंस्थेने गेल्या महिन्यात सभासदांना नऊ टक्क्यांनी डिव्हिडंट वाटप केला असून,वषार्तून दोन वेळा व्याज वाटप करते. सर्वात कमी व्याजदर असलेल्या पतसंस्था वर्गणीवर व्याज देणारी शिक्षक पतसंस्था महाराष्ट्र पहिली आहे असे नूतन पदाधिकारी म्हणाले. सभासदांच्या पाल्यांच्या लग्नकार्यात 11 हजारांची मदत देते तसेच सभासदांचे पाल्यांना 10 वी व 12 वी बोर्ड परीक्षेत 75 टक्के, शिष्यवृत्ती, नवोदय, एन. एम.एस व राष्ट्रीय, राज्य खेळाडूंचा गौरव करून सत्कार केला जातो. अशा अनेक वैशिष्ट्यने पतसंस्था कमकाज करत असल्याचे सांगण्यात आले.

शिक्षक आमदार दत्तात्रय सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली नुकतीच पतसंस्था राज्यस्तरीय झाली. बार्शी व पंढरपूर तसेच मुंबई येथे लवकरच शाखेचे उद्घाटन होणार आहे. तसेच सभासदांच्या मागणीप्रमाणे लवकरच कर्ज मयार्दा वाढविली जाणार आहे. कागद विरहीत पतसंस्था झाली आहे. हे सर्व आम्ही करत आहोत कारण सभासदांचा विश्वास आणि आमदार दत्तात्रय सावंत सरांचा पाठीवरचा हात जे काही करायचे आहे ते प्रामाणिक व सभासदांच्या हितासाठी करा असे प्रत्येकवेळी सरांचे शब्द खरेच चेअरमन, व्हा.चेअरमन व संचालक मंडळाने पाळले व यापुढेही असेच काम करण्याची ग्वाही आम्ही देत आहोत असे नूतन पदाधिकारी म्हणाले.

# माळशिरस तालुका सकल मराठा समाजाच्या वतीने प्रा.डॉ.मिनाक्षी अमोल जगदाळे यांचा सत्कार

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** प्रा.डॉ.मीनाक्षी अमोल जगदाळे यांनी आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र या विषयात पीएचडी पदवी संपादन करून त्यांनी ज्ञानाचा शिखर गाठला आहे.त्यांची ही १२ वी पदवी आहे. त्यांच्या या शैक्षणिक यशाबद्दल सकल मराठा समाज,माळशिरस तालुक्याच्या वतीने त्यांचा दिमाखदार सत्कार करण्यात आला.



या प्रसंगी विविध मान्यवरांच्या उपस्थितीत त्यांना शाल, श्रीफळ, फेटा देऊन सन्मानित करण्यात आले.

आपल्या अभ्यासातून व चिकाटीमुळे मिळविलेल्या या उल्लेखनीय यशामुळे मराठा समाजासह संपूर्ण माळशिरस तालुक्याचा गौरव वाढल्याचे मान्यवरांनी आपल्या भाषणातून नमूद केले.या सत्काराला उत्तर देताना प्रा.डॉ.मिनाक्षी जगदाळे यांनी आपल्या यशामध्ये मार्गदर्शक, कुटुंबिय व समाजाचा मोलाचा वाटा असल्याचे सांगून सर्वांचे आभार मानले. त्यांच्या या शैक्षणिक कामगिरीमुळे मराठा समाजातील युवक-युवतींसाठी प्रेरणादायी आदर्श निर्माण झाला आहे.यावेळी महाराष्ट्र जनसेवा संघटनेचे युवक प्रदेशाध्यक्ष अण्णासाहेब शिंदे, मराठा क्रांती मोचार्चे महाराष्ट्र राज्य समन्वयक धनाजी साखळकर,जेष्ठ पत्रकार भारत मगर,सागर वरकड, सयाजी गायकवाड, अनिल कदम, माळशिरस तालुका जिजाऊ बिग्रेडच्या तालुकाध्यक्ष सौ.शारदा चव्हाण उपस्थित होते.

# 'अमेरिकेच्या दबावाला झुकू नका; फासीवाद-नवफासीवादाचा धोका ओळखा' - कॉ. प्रकाश करात

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे माजी महासचिव कॉ. प्रकाश करात यांनी माकपच्या राज्यस्तरीय अभ्यास शिबिरात शाखा सचिवांना मार्गदर्शन करताना दोन महत्त्वाचे मुद्दे अधोरेखित केले – भारताच्या ऊर्जा सुरक्षेवरील अमेरिकेचा दबाव आणि फासीवाद-नवफासीवाद, अंध राष्ट्रवाद यांचा वाढता धोका.

करात म्हणाले की, "भारताने इराण, व्हेनेझुएला आणि रशियाकडून तेल खरेदी करण्याबाबत अमेरिकेच्या दबावाखाली न येता स्वतंत्र ऊर्जा धोरण राबवले पाहिजे.

"२०१९ मध्ये सुद्धा माकप च्या पॉलिट ब्युरो ने अमेरिकेच्या एकतर्फी बंदिशांना अवैध ठरवत भारताने इराणकडून स्वस्त दरात तेल खरेदी सुरू ठेवावी, अशी भूमिका मांडली होती.




२०१९ मध्ये व्हेनेझुएलानेकडून भारताने तेल खरेदी करू नये, या अमेरिकेच्या सूचनांवर अवलंबून न राहता लोकहित लक्षात घेऊन देशाला परवडणाऱ्या दरात खरेदी करावी. अशी भूमिका माकपने मांडली होती.

" आज रशियाकडून तेल खरेदी थांबविण्याचा अमेरिकेचा दबाव लोकहिताविरुद्ध असून मोदी सरकारने तो ठामपणे नाकारावा, असे पक्षाने स्पष्ट केले."

करात यांनी स्पष्ट केले की, 'भारताची ऊर्जा सुरक्षा लोकहितावर आधारित असावी. अमेरिकेच्या दबावाला ला मान्यता देणे म्हणजे देशाच्या सार्वभौमत्वाशी तडजोड आहे'. करात यांनी शाखा सचिवांना फासीवाद, नवफासीवाद, अंध राष्ट्रवाद आणि प्रतिक्रियावादी प्रवृत्ती यांविषयीही मार्गदर्शन करताना सांगितले की, "आज फासीवाद- नवफासीवादाचा धोका, तसेच अंध राष्ट्रवाद व प्रतिक्रियावादी प्रवृत्तीमुळे लोकशाही व सामाजिक ऐक्याला गंभीर आव्हान निर्माण झाले आहे".

# सीईओ जंगम शिक्षणाधिकाऱ्यांवर चिडून सभागृह सोडले

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** जिल्हा परिषद आणि महानगरपालिकेच्या विशेष शिक्षकांच्या समायोजन प्रक्रियेदरम्यान प्राथमिक शिक्षण विभागाचा ढिसाळ आणि संत कारभार पाहून वैतागलेल्या जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख यांच्या कारभारावर चिडत 'काय फालतूपणा लावलायह्न असे म्हणून थेट त्यांनी सभागृह सोडले.

सोलापूर जिल्हा परिषदेमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात सोलापूर जिल्हा परिषद आणि महानगरपालिकेच्या सुमारे शंभरहून अधिक विशेष शिक्षकांच्या समायोजनाची प्रक्रिया सुरू होती यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी जंगम प्राथमिक शिक्षणाधिकारी आदर्श महानगरपालिकेचे प्रशासनाधिकारी विठ्ठल ढेपे उपशिक्षणाधिकारी तसेच शिक्षण विभागातील अधीक्षक यांच्यासह समायोजनाला आलेले शिक्षकांची उपस्थिती होती.



सुमारे 100 कंत्राटी विशेष शिक्षकांना कायम सेवेत करण्यात आले यावेळी या प्रक्रिया दरम्यान सभागृहामध्ये प्राथमिक शिक्षण विभागाचा अत्यंत ढिसाळ कारभार सुरू होता, कोणाच्या कुणाकडे लक्ष नव्हते, हे पाहून सीईओ जंगम बरेच वैतागल्याचे दिसून आले.

त्यातच शिक्षणाधिकाऱ्यांना कुणाचे तरी फोन येत होते, कर्मचाऱ्यांनी या समायोजनाचे नियोजन व्यवस्थित केल्याचे पाहायला मिळाले नाही. बराच वेळ ताटकळत बसलेल्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी थेट प्राथमिक शिक्षणाधिकाऱ्यांना काय फालतूपणा लावलाय सर्व व्यवस्थित झाल्यावर बोलवा असे म्हणून तावातावाने सभागृह सोडले. यावरून प्राथमिक शिक्षण विभागाचा ढिसाळ कारभाराचा प्रत्यय पुन्हा एकदा पाहायला मिळाला.

# बार्शीची नांदेडमधील पूरग्रस्तांसाठी सरशी, पीडित कुटूंबियांना मदत

**बार्शी (कटूसत्य वृत्त):-** नांदेड जिल्ह्याच्या मुखेड तालुक्यातील रावणगाव (भा) येथील गावास पुराचा जबरदस्त फटका बसला. या गावातील 271 नागरिकांना गावातून सुमारे तीन किलोमीटर पाण्यातून रेस्क्यू करण्यात आले पूरग्रस्त नागरिकांना तात्पुरते निवारा शेड उभारून ठेवण्यात आले आहे. या कॅम्पमधील कुंटबियाना बार्शी तहसीलदार एफ.आर. शेख,व रेडक्रॉस सेक्रेटरी अजित कुंकूलोळ व संचालक मंडळाने मदत करण्याचे ठरविले.



तहसीलदार एफ आर. शेख यांच्यासह रेडक्रॉस सदस्य पत्रकार संतोष सुर्यवंशी, प्रशांत बुडूख,उमेश देशमाने व राहूल कुंभार यांनी गावातील पूरग्रस्त पीडित कुटुंबीयांना बार्शी इंडियन रेडक्रॉस सोसायटीच्या वतीने संसार उपयोगी साहित्य किचन सेट, चटई, बेडशीट, साडी, जर्किन, बादली, रस्सी, हॅन्ड वॉश, मेणबत्ती पाकीटे व गोडे तेल पाकीट वाटप कॅम्पमध्ये जाऊन केले.

बार्शी तिथं सरशी हे आपण अनेकदा पाहिलं आहे, बार्शीमध्ये तो सेवाभाव आणि मदतीचा हात देण्याची वृत्ती अंगीकृत आहे. त्याच सेवा भावानेतून बाशीर्तील इंडियन रेड क्रॉस सोसायटीच्यावतीने पूरग्रस्त पीडितांना मदतीचा हात देण्यात आला.

नोंदणी क्र.: एसयुआर/एमएचएल/आरएसआर(आर)/१६१२/२००३ दि. २३/१०/२००३

## चंद्रमौळी ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था

**मर्यादित, मोहोळ ता. मोहोळ**

११०, मार्केट यार्ड, मोहोळ ता. मोहोळ जि. सोलापूर ४१३२१३.

### वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

(फक्त सभासदांकरिता)

सन्माननीय सभासद बंधु भगिनींनो,

चंद्रमौळी ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादित मोहोळ तालुका मोहोळ जिल्हा सोलापूर या संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा मंगळवार दिनांक ०९/०९/२०२५ रोजी दुपारी १.०० वाजता संस्थेचे कार्यालय, मार्केट यार्ड, मोहोळ येथे खालील विषयांवर चर्चा करुन निर्णय घेणेसाठी आयोजित केली आहे. तरी सर्व सभासदांनी उपस्थित रहावे, ही विनंती.

**- सभेपुढील विषय -**

१) मागील दिनांक २४/०९/२०२४ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या कामकाजाचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२) संचालक मंडळ, संस्थेच्या कार्याबद्दलच्या ३१ मार्च २०२५ अखेरच्या अहवालावर विचार करुन स्विकृत करणे.
३) वैधानिक लेखापरिक्षकाकडून आलेल्या सन २०२४-२५ चा लेखापरिक्षण अहवाल, ताळेबंद व नफा-तोटा पत्रकावर विचार करणे व स्विकृत करणे.
४) कायदा व नियम यास अनुसरुन नफा वाटणीस मान्यता देणे.
५) पुढील सन २०२५-२०२६ करिता संचालक मंडाळाने तयार केलेल्या अंदाजपत्रकाची व गत वर्षाच्या अंदाजपत्रकातील खर्चाची माहिती देणे व मान्यता देणे.
६) संचालक मंडळ सदस्य व त्यांचे नातेवाईक यांना दिलेल्या कर्जाची माहिती घेणे.
७) सन २०२५-२०२६ या वर्षाकरिता लेखापरिक्षण करणेसाठी पात्र वैधानिक लेखापरिक्षकाची नेमणूक करणे व त्यांचे मानधन ठरविणे.
८) अंतर्गत लेखापरिक्षकाची नेमणूक करणे व मेहनताना ठरविणे.
९) लेखापरिक्षण दोष दुरुस्ती अहवाल तयार करणे व पूर्तता करणे.
१०)वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थिती असणाऱ्या सभासदांची क्षमापित करणे.
११)मा. अध्यक्ष यांचे परवानगीने आयत्या वेळी येणाऱ्या विषयांवर चर्चा करुन निर्णय घेणे.

मा. संचालक मंडळाच्या आदेशावरुन
स्थळ : मोहोळ
दिनांक : २५/०८/२०२५

एस्. जे. गावडे — प्र. व्यवस्थापक
राजेश जगन्नाथ खपाले — चेअरमन

**विशेष सुचना :**

१) गणसंख्येच्या अभावी सभा तहकूब झाल्यास सदर वार्षिक सभा त्याच दिवशी दु. १.३० वाजता वरील ठिकाणीच व वरील विषयांसाठी होईल. सदर सभेस कोरमची आवश्यकता असणार नाही.
२) संस्थेच्या कामकाजाबाबत काही प्रश्न विचारणे असल्यास ते संस्थेच्या कार्यालयात दि. ०१/०९/२०२५ चे पूर्वी लेखी पाठवावेत ऐनवेळी येणाऱ्या प्रश्नांचा विचार करणे अशक्य आहे.
३) सभासदांनी आपला पत्ता बदलला असल्यास त्याची व वारसांची नोंद केली नसल्यास वारसाची नोंद करावी.
४) सर्व सभासदांना विनंती की, त्यांनी आपले भागदाखले संस्थेतून घेऊन जावेत.
५) क्रियाशील सभासदत्व राहणेसाठी वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित राहणे अत्यावश्यक आहे. कृपया याची नोंद घ्यावी.